# बीड जिल्ह्यातील भूमीउपयोजन : एक अध्ययन

**प्रा.डॉ. राजपंगे एम.जी.**
भूगोल विभाग,
आनंदराव धोंडे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
कडा, ता.आष्टी, जि. बीड

**प्रस्तावना:**

मानवाच्या मुलभूत गरजा या भूमीशी निगडित आहेत. मानव त्याच्या गरजेनुसार भूमीचा उपयोग करत असतो. ज्या प्रकारची गरज असेल त्या पध्दतीने भूमीउपयोजन केले जाते. भूमी उपयोजन हे स्थलकाल सापेक्ष असते. भूमी उपयोजन हे स्थलकालानुसार व काळानुसार बदलत असते. सर्वसाधारणपणे भूमीचा वेगवेगळ्या घटकांसाठी, मानवाने केलेला वापर म्हणजे भूमी उपयोजन होय. असे भूमी उपयोजन विशिष्ट वेळेला विशिष्ट ठिकाणी विकसित किंवा अविकसित अशा दोन्हीही जमीनीत केले जाते. उपलब्ध भूमीच्या प्रत्येक तुकड्याचा जास्तीत जास्त वापर करण्याचा प्रयत्न केला जातो.

**अभ्यासक्षेत्र :**

बीड जिल्हा मराठवाड्याच्या मध्यस्थानी आहे. बीड जिल्ह्याचा अक्षवृत्तीय विस्तार १८°२७' उत्तर ते १९°२७' उत्तर अक्षांश व रेखावृत्तीय विस्तार ७४°४९' पूर्व ते ७६°४४' पूर्व रेखांश असा आहे. जिल्ह्याच्या उत्तरेस औरंगाबाद व जालना, पूर्वेस परभणी व लातूर हे जिल्हे आहेत. दक्षिणेस उस्मानाबाद व अहमदनगर तर पश्चिमेस अहमदनगर जिल्हा आहे. जिल्ह्याचे एकूण क्षेत्रफळ १०६९४ चौ.कि.मी. असून ते महाराष्ट्राच्या एकूण क्षेत्रफळाच्या ३.४७% एवढे आहे. २०११ च्या जनगणनेप्रमाणे जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २५,८५,०४९ होती. महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येशी हे प्रमाण २.३०% आहे. जिल्ह्यात एकूण ११ तालुके आहेत. प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने जिल्ह्याचे दोन महसुली विभाग पाडण्यात आले आहे. एक उपविभाग बीड येथे असून याअंतर्गत बीड, गेवराई, पाटोदा, आष्टी, शिरुर (कासार) हे तालुके येतात. दुसरा उपविभाग अंबाजोगाई येथे असून त्याखाली अंबाजोगाई, केज, माजलगांव, धारुर, परळी, वडवणी हे तालुके येतात. जनगणना २०११ नुसार जिल्ह्यात एकूण १३६८ गांवे आहेत.

**बीड जिल्ह्यातील भूमी उपयोजन:**

बीड जिल्ह्यातील भूमी उपयोजनाचा अभ्यास करण्यासाठी सन २००१ व २०१५ या कालावधीचा विचार करण्यात आला आहे. या दोन्ही वर्षाच्या भूमी उपयोजनाचा अभ्यास करुन त्यातील बदलाचे अध्ययन तक्ता क्र. १ मध्ये करण्यात आले आहे.

तक्ता क्र. १

**बीड जिल्ह्यातील भूमीउपयोजन (सन २००१ व २०१५)**

(क्षेत्र हेक्टरमध्ये)

| तालुका | वर्ष | नांखालील क्षेत्र | शेतीकरीता उपलब्ध नसलेले क्षेत्र | र लागवड न झालेली जमीन | पडिक जमीन | गवडी खालील क्षेत्र | एकुण भौगोलिक क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| आष्टी | २००१ | २६९२ | ९१२० | ५८८४ | ६४८७ | १२२९०६ | १४७०८९ |
| | % | (१.८३) | (६.२०) | (४.००) | (४.४१) | (८३.५६) | (१००) |
| | २०१५ | २२२३ | ८१३३ | ४८३१ | ६७३६ | १२५१६६ | १४७०८९ |
| | % | (१.५१) | (५.५३) | (३.२८) | (४.५८) | (८५.१०) | (१००) |
| | बदल (%) | -०.३२ | -०.६७ | -०.७२ | ०.१७ | १.५४ | |
| पाटोदा | २००१ | २५८३ | ६०८० | ५१५८ | ५०८० | ६८०७८ | ८६९७९ |
| | % | (२.९७) | (६.९९) | (५.९३) | (५.८४) | (७८.२७) | (१००) |
| | २०१५ | २०३२ | ५१८७ | ५८८३ | ४०४० | ६९८३७ | ८६९७९ |
| | % | (२.३४) | (५.९६) | (६.७६) | (४.६४) | (८०.२९) | (१००) |
| | बदल (%) | -०.६३ | -१.०३ | ०.८३ | -१.२० | २.०२ | |
| शिरुर (का) | २००१ | २२२७ | ५२५५ | ४४४६ | २८१९ | ६०२२४ | ७४९७१ |
| | % | (२.९७) | (७.०१) | (५.९३) | (३.७६) | (८०.३३) | (१००) |
| | २०१५ | १७८४ | ५६९१ | ३३६२ | २१९६ | ६१९३८ | ७४९७१ |
| | % | (२.३८) | (७.५९) | (४.४८) | (२.९३) | (८२.६२) | (१००) |
| | बदल (%) | -०.५९ | ०.५८ | -१.४५ | -०.८३ | २.२९ | |
| गेवराई | २००१ | १७२० | ५६०९ | ३२१८ | ८९७१ | १२५६९८ | १४५२१६ |
| | % | (१.१८) | (३.८६) | (२.२२) | (६.१८) | (८६.५६) | (१००) |
| | २०१५ | १०११ | ६१८१ | २८३३ | ६९७१ | १२८२२० | १४५२१६ |
| | % | (०.७०) | (४.२६) | (१.९५) | (४.८०) | (८८.३०) | (१००) |
| | बदल (%) | -०.४९ | ०.३९ | -०.२७ | -१.३८ | १.७४ | |
| माजलगाव | २००१ | ६६३ | ६८२४ | ५८५९ | २१२६ | ७९७६९ | ९५२४१ |
| | % | (०.७०) | (७.१६) | (६.१५) | (२.२३) | (८३.७५) | (१००) |
| | २०१५ | ४३५ | ४२४७ | ४८११ | २८३४ | ८२९१४ | ९५२४१ |
| | % | (०.४६) | (४.४६) | (५.०५) | (२.९८) | (८७.०६) | (१००) |
| | बदल (%) | -०.२४ | -२.७१ | -१.१० | ०.७४ | ३.३० | |
| वडवणी | २००१ | १४६७ | १९३९ | ३३६६ | ८७५ | ३२६६१ | ४०३०८ |
| | % | (३.६४) | (४.८१) | (८.३५) | (२.१७) | (८१.०३) | (१००) |
| | २०१५ | ११७६ | १५९४ | ३०९० | ८७५ | ३३५७३ | ४०३०८ |
| | % | (२.९२) | (३.९५) | (७.६७) | (२.१७) | (८३.२९) | (१००) |
| | बदल (%) | -०.७२ | -०.८६ | -०.६८ | ०.०० | २.२६ | |

| तालुका | वर्ष | नांखालील क्षेत्र | करीता उपलब्ध नसलेले क्षेत्र | र लागवड न झालेली जमीन | पडिक जमीन | ावडी खालील क्षेत्र | एकुण भौगोलिक क्षेत्र |
|---|---|---|---|---|---|---|---|
| बीड | २००१ | ५७१२ | ५२२१ | ७८५६ | ४२३६ | १३३०७७ | १५६१०२ |
| | % | (३.६६) | (३.३४) | (५.०३) | (२.७१) | (८५.२५) | (१००) |
| | २०१५ | ५१७७ | ६२८८ | ५७२६ | २९३२ | १३५९७९ | १५६१०२ |
| | % | (३.३२) | (४.०३) | (३.६७) | (१.८८) | (८७.११) | (१००) |
| | बदल (%) | -०.३४ | ०.६८ | -१.३६ | -०.८४ | १.८६ | |
| केज | २००१ | ३०३९ | ६४९४ | ४४६२ | ३९७० | ८७३५४ | १०५३१९ |
| | % | (२.८९) | (६.१७) | (४.२४) | (३.७७) | (८२.९४) | (१००) |
| | २०१५ | २७०९ | ४८६३ | ४७६८ | १८७५ | ९११०४ | १०५३१९ |
| | % | (२.५७) | (४.६२) | (४.५३) | (१.७८) | (८६.५०) | (१००) |
| | बदल (%) | -०.३१ | -१.५५ | ०.२९ | -१.९९ | ३.५६ | |
| धारुर | २००१ | १५६८ | २४४८ | ४५१८ | १२५५ | ४३१८७ | ५२९७६ |
| | % | (२.९६) | (४.६२) | (८.५३) | (२.३७) | (८१.५२) | (१००) |
| | २०१५ | १४८४ | २१७२ | ४४३३ | ८५४ | ४४०३३ | ५२९७६ |
| | % | (२.८०) | (४.१०) | (८.३७) | (१.६१) | (८३.१२) | (१००) |
| | बदल (%) | -०.१६ | -०.५२ | -०.१६ | -०.७६ | १.६० | |
| परळी | २००१ | ६४७ | २१२५ | ५२७८ | ८२४ | ६३९३३ | ७२८०७ |
| | % | (०.८९) | (२.९२) | (७.२५) | (१.१३) | (८७.८१) | (१००) |
| | २०१५ | ७०३ | १६११ | ५१८६ | ५२२ | ६४७८५ | ७२८०७ |
| | % | (०.९७) | (२.२१) | (७.१२) | (०.७२) | (८८.९८) | (१००) |
| | बदल (%) | ०.०८ | -०.७१ | -०.१३ | -०.४१ | १.१७ | |
| अंबाजोगाई | २००१ | २४८४ | ६२५४ | ३८५८ | २७८४ | ७६९९२ | ९२३७२ |
| | % | (२.६९) | (६.७७) | (४.१८) | (३.०१) | (८३.३५) | (१००) |
| | २०१५ | २१४२ | ५८४५ | ४०२० | २२८८ | ७८०७७ | ९२३७२ |
| | % | (२.३२) | (६.३३) | (४.३५) | (२.४८) | (८४.५२) | (१००) |
| | बदल (%) | -०.३७ | -०.४४ | ०.१८ | -०.५४ | १.१७ | |
| बीड जिल्हा | २००१ | २४८०२ | ५७३६९ | ५३९०३ | ३९४२७ | ९३८७९ | ०६९३८० |
| | % | (२.३२) | (५.३६) | (५.०४) | (३.६९) | (८३.५९) | (१००) |
| | २०१५ | २०८७६ | ५१८१२ | ४८९४३ | ३२१२३ | १५६२६ | ०६९३८० |
| | % | (१.९५) | (४.८५) | (४.५८) | (३.००) | (८५.६२) | (१००) |
| | बदल (%) | -०.३७ | -०.५२ | -०.४६ | -०.६८ | २.०३ | |

स्त्रोत: बीड जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन, २००१ व २०१५

कंसातील आकडे एकुणाशी टक्केवारी दर्शवितात.

**१) वनांखालील क्षेत्र:**

वनांखालील क्षेत्र हे पर्यावरणाच्या समतोलाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे असते. सुदृढ पर्यावरणासाठी किमान ३३% क्षेत्र वनांखाली असणे आवश्यक आहे. बीड जिल्ह्याचा विचार करता हे क्षेत्र २% पेक्षा कमी असल्याचे दिसून येते. बीड जिल्ह्याचा एकत्रित आढावा घेतला तर असे आढळते की, २००१ मध्ये वनाखालील क्षेत्र २४८०२ हेक्टर एवढे होते तर सन २०१५ नुसार हे क्षेत्र २०८७६ हेक्टर इथपर्यंत पोहचले आहे. याचाच अर्थ वनाखालील क्षेत्रामध्ये ०.३७% इतकी घट झाली आहे. सन २०१५ मध्ये वनाखालील क्षेत्राचे एकुण भौगोलिक क्षेत्राची प्रमाण १.९५% इतके आहे. तालुकानिहाय वनांखालील क्षेत्रानुसार असे दिसते की, सर्वात कमी क्षेत्र माजलगाव तालुक्यात (०.४६%) तर सर्वात जास्त क्षेत्र बीड तालुक्यात (३.३२%) आढळून येते. १% पेक्षा कमी वनक्षेत्र माजलगाव, ग़ेवराई व परळी या तालुक्यात आढळते तर १% पेक्षा जास्त वनक्षेत्र हे ऊर्वरित तालुक्यात आढळते.

**२) शेतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र:**

शेतीसाठी उपलब्ध नसलेले क्षेत्र या भूमी वर्गीकरणात शेतीसाठी अनुपलब्ध क्षेत्र व लागवडीस योग्य नसलेल्या क्षेत्राचा समावेश होतो. ब़ीड जिल्ह्यातील शेतीसाठी उपलब्ध नसलेल्या क्षेत्राचा विचार केला तर असे लक्षात येते की, सन २००१ नुसार जिल्ह्यातील हे क्षेत्र ५७३६९ हेक्टर इतके होते ज्यात घट होऊन ते ५१८१२ हेक्टर इथपर्यंत पोहचले आहे. म्हणजेच शेतीसाठी उपलब्ध नसलेल्या क्षेत्रामध्ये -०.५२ इतका बदल झाला आहे. २०१५ नुसार जिल्ह्यामध्ये या प्रकारात एकुण भौगोलिक क्षेत्रापैकी ४.८५% एवढी भूमी व्याप्त आहे. शेतीसाठी उपलब्ध नसलेले सर्वाधिक क्षेत्र शिरुर (कासार) तालुक्यात (७.५९%) तर सर्वात कमी क्षेत्र परळी (२.२१%) तालुक्यात आढळून आले. जिल्हा सरासरीपेक्षा जास्त क्षेत्र हे आष्टी, पाटोदा, शिरुर (कासार) व अंबाजोगाई या तालुक्यात आढळून येते तर ऊर्वरित तालुक्यात जिल्हा सरासरीपेक्षा कमी क्षेत्र आढळून येते.

**३) पडिक जमीन:**

पडिक जमीन ही वेगवेगळ्या कारणाने बनलेली असते. अलिकडच्या काळातील रासायनिक खते व अतिरिक्त जलसिंचनामुळे सुध्दा जमीन ही पडिक होते व शेती लागवडीस अयोग्य होते. किंवा या जमीनीतील मृदा अशा स्वरुपाची असते की, त्यातून पीक उत्पादन होऊ शकत नाही. बीड जिल्ह्याच्या संदर्भात अशा जमीनीचा विचार केला तर सन २००१ नुसार पडिक क्षेत्र हे ३९४२७ हेक्टर इतके होते ते कमी होऊन २०१५ मध्ये ३२१२३ हेक्टर इतके झाले आहे. म्हणजेच २००१ ते २०१५ दरम्यान पडिक क्षेत्रात ०.६८% ने घट झाली आहे. सन २०१५ च्या आकडेवारीनुसार एकुण भौगोलिक क्षेत्रापैकी जिल्ह्यात ३.००% ज़मीन ही पडिक जमीन आहे. सर्वात कमी पडिक जमीनीचे क्षेत्र हे परळी तालुक्यात तर सर्वाधिक क्षेत्र हे ग़ेवराई तालुक्यात आढळून आले. पडिक जमीनीसंदर्भातील तालुकानिहाय आकडेवारी ही विविधता दर्शविणारी आहे.

**४) इतर लागवड न झालेली जमीन:**

बीड जिल्ह्याच्या इतर लागवड न झालेल्या जमीनीचा विचार केल्यास असे दिसते की, सन २००१ च्या

आकडेवारीनुसार इतर लागवड न झालेली जमीन ही ५३९०३ हेक्टर इतकी होती. २०१५ च्या आकडेवारीनुसार ही जमीन ४८९४३ हेक्टर इतकी आहे. म्हणजे २००१ ते २०१५ या कालावधीत इतर लागवड न झालेली जमीन ही ०.४६% ने कमी झाली आहे. २०१५ नुसार एकुण भौगोलिक क्षेत्रापैकी ४.५८% क्षेत्र हे इतर लागवड न झालेली जमीन व्याप्त आहे. सन २०१५ नुसार तालुकानिहाय विचार केला तर इतर लागवड न झालेली सर्वात कमी जमीन ही ग़ेवराई तालुक्यात १.५५% इतकी आढळून येते तर सर्वात जास्त जमीन ही धारुर तालुक्यात आढळून येते. इतर लागवड न झालेली जमीनीचे ४% पेक्षा जास्त क्षेत्र माजलगाव, पाटोदा, परळी, वडवणी, धारुर या तालुक्यात तर ४% पेक्षा कमी क्षेत्रे हे ऊर्वरित तालुक्यात आढळून येते.

**५) लागवडी खालील क्षेत्र:**

लागवडीखालील क्षेत्र अन्नधान्य उत्पन्नासाठी महत्वाचे असते. लागवडीखालील क्षेत्र जितके जास्त असेल तितके उत्पादन जास्त असते. सन २००१ नुसार लागवडी खालील क्षेत्र हे ८९३८७९ हेक्टर इतके होते ते वाढून २०१५ मध्ये ९१५६२६ हेक्टर इतके झाले आहे. म्हणजेच लागवडी खालील क्षेत्रात २.०३% इतका बदल झालेला आहे. एकुण भौगोलिक क्षेत्रापैकी जिल्ह्यात एकुण ८५.६२% क्षेत्र लागवडीखाली आहे. यापैकी सर्वात जास्त क्षेत्र हे परळी तालुक्यात ८८.९८% इतके आढळून येते तर सर्वात कमी लागवडीखालील क्षेत्र हे पाटोदा तालुक्यात ८०.२९% इतके आढळते. एकुण क्षेत्राच्या ८४% पेक्षा कमी क्षेत्र पाटोदा, शिरुर (का), धारुर व वडवणी तालुक्यात तर ८४% ते ८६% क्षेत्र अंबाजोगाई, आष्टी व केज तालुक्यात आढळते. याशिवाय ८६% पेक्षा जास्त क्षेत्र माजलगाव, बीड, गेवराई व परळी तालुक्यात आढळून येते.

**संदर्भ :**

१) प्रा. डॉ. जगदिश सिंह (१९९८): संसाधन भूगोल, राधा पब्लिकेशन, नवी दिल्ली.
२) डॉ. शेटे, डॉ. फुले, डॉ शहापूरकर (२००८): वस्ती भूगोल, विदयाभारती प्रकाशन, लातूर.
३) प्रा. डॉ. मोहन गुळवे (२००६): लोकसंख्या भूगोल, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
4) Singh V.B. (1990) Land Development Banking in India Common Wealth Published New Delhi.
5) Deshpande C. D. (1971) : "Geography of Maharashtra" National Book Trust, India, New Delhi.
6) Pawar C.T. (1989) : "Impact of Irrigation : A Regional perspective". Himalaya Publishing House, Bombay.